# जून २०२४ चे राशी भविष्य- वैशाख कृष्ण पक्ष आणि जेष्ठ शुक्ल आणि कृष्ण पक्ष

**लेखक-अजय तनखीवाले**



## पार्श्वभूमी : या महिन्यात

१.गुरु हर्षलची जोडी वृषभेत तुमच्या जीवनात नवीन रंग भरेल. शनि मासाअखेर वक्री होतो आणि थोडीशी माघार घ्यायला लावतो.


२. ७ जून रोजी रवी मृग नक्षत्रात प्रवेश करतो आणि भारतात पावसाळ्याचे वारे सुरु होतील. २२ जून ला रवी आर्द्रा नक्षत्रात येणार आणि चांगलाच पाऊस आणणार. २० जून रवीचे दक्षिणायन सुरू होणार, उन्हाळा समाप्ती कडे वाटचाल होणार.


**उत्सव**: ज्ञानेश्वर जयंती-६ जून, निर्जळी एकादशी- १८ जून, वट पौर्णिमा- २१ जून

**महत्वाच्या तारखा:** अमावस्या- ८ जून, पौर्णिमा – २१ जून.

२.०: महिन्यातील गोचर ग्रह युती: १. मकरेत प्लुटो, २. कुंभेत शनि ३. रवि, शुक्र, बुध, गुरू, हर्षल वृषभेत, ४. राहू, नेपच्यून, मिनेत. ५. केतू कन्या राशीत आहे. मंगल मेषेत


१.२ – ८ जून रोजी ची कुंडली व २१ जूनची कुंडली

<table>
<tr><th>८ जूनची कुंडली</th><th>२१ जूनची कुंडली</th></tr>
<tr><td>


</td><td>


</td></tr>
</table>

## २.०: भविष्य-चंद्र राशी प्रमाणे: (आपल्या चंद्र राशी (भारतीय पध्दती) प्रमाणे वाचा)


| राशी | भविष्य |
|---|---|
| २. १ मेष राशी (Mesh):<br> | ● *शनि -११वा, गुरु -२रा, राहू -१२वा (अनिष्ठ)*<br>● *अ. स्वास्थ्य*<br>    ● अनपेक्षित रोगराई पासून सांभाळा. उष्णतेचे आजार होऊ शकतात.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>    ● गुरुच्या साथीने धंदा उत्तम चालेल. स्वतंत्र व्यवसायिकांना पूर्वार्धात लाभ. नोकरीत प्रगती कराल. कर्ज मुक्ती होईल.<br>    ● आधुनिक तंत्रज्ञान शिकून, कंपनीत वरच्या हुद्यावर जाल.<br>● *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>    ● वैवाहिक संस्थामधून उत्तम स्थळे येतील. अती उतावळेपणा टाळावा पण आलेली संधी सोडू नये.<br>● *ड . वित्त/गुंतवणुकी*<br>    ● मोठ्या कंपन्यांचे भागीदार व्हाल. दूर दृष्टी ठेऊन पैसे गुंतवाल.<br>    ● आधुनिक साधन वापरलीत तर जमीन खरेदीची धडपड यशस्वी होईल. अमावस्या घबाडयोगाची असेल.<br>● *इ . कौटुंबिक*<br>    ● आईला परदेशी आणण्यात मोठे अडथळे येतील. जुलै पासून तिची तब्येत सांभाळावी. भावंडांची मोठी साथ मिळेल. काही छंद, गायन /लिखाण तुम्हास एकत्र करतील.<br>● *फ . परदेश गमन*<br>    ● परदेशात मोठा भाग्योदय होईल. कलाकारांना उत्तम काळ आहे. |
| २.२ वृषभराशी (Vrishabha):<br> | ● *शनि -१० वा गुरु -१ला , राहू -११वा*<br>● *अ. स्वास्थ्य*<br>    ● पूर्वार्धात स्वास्थ्य उत्तम असेल. पुढे उष्णतेचा त्रास होईल. तरूणांना जोडीदार लाभेल.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>    ● नोकरीत महत्वाचा हुद्दा मिळेल. शनिमुळे धंदा उत्तम चालेल. तरुण मंडळीचा उत्कर्ष होईल.<br>● *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>    ● पूर्वार्धात पतीपत्नीचा सुखाचा काळ जाईल. |

| | |
|---|---|
| | • *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>    • या महिन्यात थोड्या जुगारी गुंतवणुकी कराल. बुद्धी चातुर्यातून लाभ घडतील.<br>• *इ . कौटुंबिक*<br>    • मुलांना तुमची गरज असेल, त्यांना मदत कराल.<br>• *फ . परदेश गमन*<br>    • नवीन कंत्राटासाठी परदेश गमनाची दाट शक्यता आहे. |
| २.3 मिथुन राशी (Mithun):<br> | • शनि-*९ वा, गुरु -१२ वा (अनिष्ठ) , राहू – १० वा*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>    • उत्तरार्ध सुखाचा जाईल. मधूमेहाचे प्रमाण वाढले तर त्रास होईल<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>    • नोकरीत गुंतागुंतीची कारस्थाने चालतील. तुम्हाला हा गुंता सावरता येईल. तरुणांचे मोठे मानसन्मान होतील.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>    • उत्तरार्धात जोडीदार सर्व प्रकारे मदत करेल. दोघांचा विशिष्ठ भाग्योदय होईल.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>    • जरा पैश्याची नासधूस होईल, जास्त रिस्क घेऊ नये.<br>• *इ . कौटुंबिक*<br>    • भावंडांशी फार ताणून घेऊ नये. पुत्र जन्म होईल. तीर्थ यात्रा होईल.<br>• *फ . परदेश गमन*<br>    • या वर्षी बरेच दौरे होतील. परदेशी शैक्षणिक संधीचा लाभ घ्याल. |
| २.४ कर्क राशी (Karka):<br> | • *शनि –८ वा (अनिष्ठ), गुरु -११ वा, राहू -९ वा*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>    • अपघाताची भीती बाळगा, वाहन सावधपणे चालवा.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>    • कामावर पुढाकार घ्याल तर पुढे जाल. कुणाची परवानगीची वाट बघाल तर मागे पडाल. शासनाकडून त्रास होणार. हितशत्रू मागावर असणार.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>    • गुरु लाभेल, संसार उत्तम चालेल.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>    • सल्लागारांच्या मदतीने आधुनिक कंपन्यात गुंतवणुकी कराल.<br>    • देवाण घेवाणात फसगत होण्याची शक्यता आहे. आपल्या मौल्यवान वस्तू सांभाळून ठेवा. कर्ज वसुली होईल. |

| | |
|---|---|
| | • *इ. कौटुंबिक*<br>  ◦ आईची आणि मुलांची तब्येत सांभाळा, उष्णतेचा त्रास होऊ शकतो.<br>  ◦ मुलांना अभ्यासात उत्तम बक्षिसे मिळतील.<br>• *फ. परदेश गमन*<br>  ◦ परदेश गमन होईल, पण मॅनेज करावं लागेल. सर्व संधी साधा. |
| २. ५ सिंहराशी (Simha):<br><br> | • *शनि – ७ वा, गुरु - १० वा , राहू – ८ वा (अनिष्ठ)*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>  ◦ अपघातांपासून सांभाळा, अनपेक्षित दिशेने धडक बसण्याची शक्यता.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>  ◦ पूर्वार्धात राजा म्हणून मिरवाल. तुमच्या बौद्धिक क्षमतेची स्तुती होईल. त्यात तुमच्या आधुनिक ज्ञानाची (AI) तय्यारी उत्तम असेल. नंतर राजकारण टाळा.<br>  ◦ भागीदार उत्तम साथ देईल. व्यावसायिक उत्कर्ष.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ◦ दूरदृष्टीचे सर्व प्रकल्प उत्तमपणे राबवत वर्ष निघून जाईल.<br>  ◦ जोडीदार उत्तम साथ देईल.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  ◦ कोर्ट कचेऱ्यांत निर्णय तुमच्या बाजुने येतील. गुरुं ग्रहाची साथ आहे.<br>• *इ . कौटुंबिक*<br>  ◦ कुटुंब साथ देईल.<br>• *फ . परदेश गमन*<br>  ◦ परदेशी कंपन्या तुम्हाला कंत्राट पाठवतील, तुम्ही स्वतः सही करायला परदेशी जाल. तुमच्या धाडशी योजना तुम्ही राबवाल. |
| २. ६ कन्या राशी (Kanya):<br><br> | • *शनि – ६ वा (अनिष्ठ) , गुरु -९ वा , राहू -७ वा*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>  ◦ अपघातांपासून जपून,  अग्नी पासून सांभाळा.<br>• *ब. नोकरी/धंदा*<br>  ◦ उत्तरार्धात नोकरीत उत्कर्ष होईल. पारितोषिक मिळवाल. व्यावसायिक तेजी येइल.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ◦ संसारात गैरसमज टाळा. तरुणांचे भाग्योदय होतील.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी* |

| | |
|---|---|
| | ○ स्थावर जंगम खरेदीची दाट शक्यता आहे. शत्रुत्वाच्या झळ बसू शकतात.<br>• *इ. कौटुंबिक*<br>○ मुलांबरोबर वेळ घालवा. त्यांचा उत्साह वाढवा.<br>• *फ. परदेश गमन*<br>○ परदेशात गवगवा होईल. मोहीम फत्ते होईल. |
| २.७ तूळ राशी (Tula):<br><br> | • *शनि - ५वा, गुरु ८ वा (अनिष्ठ), राहू-६ वा (अनिष्ठ)*<br>• *- अ. स्वास्थ्य*<br>○ उत्तरार्धात तब्येत जपा.<br>○ उष्णतेचे विकारापासून सांभाळा.<br>• *ब. नोकरी/धंदा*<br>○ कामावर परदेशातून आलेले कंत्राट नीट पडताळून घ्या.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>○ घरात कौटुंबिक वातावरण दूषित असू शकते.<br>○ एकमेकांना समजून घ्या.<br>○ नव परिचितांनी एकमेकास सांभाळावं.<br>○ ओळखीतून विवाहस्थळे येतील.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>○ जमीन जुमल्यात फसवणुकी होतील. पौर्णिमे जवळ वसुली होईल.<br>• *इ. कौटुंबिक*<br>○ मुलांचा सर्व क्षेत्रात उत्कर्ष होईल.<br>○ भावंडात कुरबुर झाली तर तुम्हास कळेल. प्रिय व्यक्तीशी गैरसमज टाळा.<br>• *फ. परदेश गमन*<br>○ शक्यता कमी पण संधी सोडू नका. |
| २. ८ वृश्चिक राशी (Vrishchika):<br><br> | • *अ. शनि – ४ था, गुरु -७ वा, राहू -५वा*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>○ पूर्वार्ध सुखाचा पण उत्तरार्धात तब्येत सांभाळा.<br>• *ब. नोकरी/धंदा*<br>○ शत्रूंपासून सांभाळा. पौर्णिमेजवळ सरकारी व बँकांची कामे उरकता येतील.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>○ पुर्वार्धात साथीदाराज्यबरोबर उत्तम जमेल. त्यावेळेस, तुम्हाला आवडतील असे निर्णय घ्या.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुकी* |

| | |
|---|---|
| | ● आई वाडिलांच्या घरात पैसे गुंतवाल, घराची मोठी डागडुजी काढाल. किचकट गुंतवणुका होतील. आर्थिक व्यवहारात घोटाळे होऊ देऊ नये.<br>● *इ . कौटुंबिक*<br>● भावंडां बरोबर नवीन प्रकल्प चालू ठेवाल. मुलांच्या जीवनातले संघर्ष उत्तमपणे हाताळाल. पुत्रचिंता करु नये.<br>● *फ . परदेश गमन*<br>● योग कमी आहेत पण तरी जुळून आले तर जाल. |
| २. ९ धनू राशी(Dhanu):<br> | ● *अ. शनि – ३ रा , गुरु -,४ था , राहू -६ वा (अनिष्ठ)*<br>● *अ. स्वास्थ्य*<br>● डोळ्यांना जपून, चष्मा लावून घ्यावा. रोगराई पासून स्वतःला वाचावा.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>● यश फसवं असते. पण समज असली तर शेपटावर निभावेल.<br>● पण कामे कायदेशीर करा.<br>● *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>● भागीदाराचा समाजात गौरव होईल. विवाहविषयक हालचाली होतील.<br>● *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>● गुंतवणुकी संथ आहेत अस वाटेल. पूर्वार्धात खटला जिंकाल.<br>● महत्वाच्या गाठीभेटी कराल.<br>● *इ . कौटुंबिक*<br>● भावंडात उत्तम जुळवून घ्याल. मुलांना जवळ ठेवा, भरकटू देऊ नका. रुसवे फुगवे चालून घ्या.<br>● *फ . परदेश गमन*<br>● प्रयत्न चालू ठेवा. |
| २. १० मकर राशी (Makar):<br> | ● *शनि- २ रा, गुरु –५ वा, राहु -३ रा*<br>● *अ. स्वास्थ्य*<br>● उत्तरार्धात शत्रू पीडेवर मात कराल, पण थोडी रोगराई होण्याची शक्यता आहे. उत्तरार्धात ग्रहांची उत्तम साथ मिळेल.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>● नोकरीत धाडशीपणा दर्शविण्याची गरज आहे. व्यापारात जपून, नुकसान टाळा.<br>● *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे* |

| | |
|---|---|
| | ● भागीदाराशी थोड्या विचित्र पद्धतीचा संवाद साधाल. परंतु  प्रेमाची कमी नसणार. प्रेमप्रकरणात फसू नये.<br>● *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>● शनि धनात उत्तम फळ देईल, चांगल्या गुंतवणुकी कराल. आर्थिक कोंडी फुटेल.<br>● *इ. कौटुंबिक*<br>● कौटुंबिक समस्या भेडसावतील पण तुम्हाला अंदाज असेल की ह्याला कोण कारणीभूत आहे. तब्येती बाबत आईला मदत लागेल, ज्वर असण्याची शक्यता आहे. पूर्वार्धात  मुलांना उत्तम पारितोषिक मिळतील. त्यांच्या बुद्धिमत्तेची प्रशंसा होईल.<br>● *फ. परदेश गमन*<br>● परदेशी जाण्यास प्रयत्न चालू ठेवा. |
| २. ११ कुंभ राशी (Kumbha):<br><br> | ● *अ. शनि – १ पहिला, गुरु – ४ था , राहू – १ रा*<br>● *अ. स्वास्थ्य*<br>● जुन्या व्याधींचा छळ चालू असेल.<br>● तेव्हढे सोडून, उत्तम स्वास्थ्य असणार.<br>• *ब. नोकरी/धंदा*<br>● व्ययक्तिक कॉन्सुलटींग चालू असणार व आधुनिक तंत्रज्ञान वापरुन त्यात उत्तम कामगिरी कराल. उत्तरार्धात  महत्वाकांक्षा पूर्ण होतील. काही सन्मान मिळतील.<br>● *क.  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>● थोडे जपून, शनि भिजत घोंगडे ठेवतो पण मनास आवडते स्थळ येईल. पटकन विवाह जुळेल.<br>● *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>● भल्या मोठ्या गुंतवणुकीत रिस्क घेणे असणारच.<br>● *इ. कौटुंबिक*<br>● भावंडांशी वादविवाद होतील. थोडे जपून.<br>● मंगळाच्या आहारी जाऊ नका मनावर व जिभेवर ताबा ठेवा.<br>● *फ. परदेश गमन*<br>● परदेश गमनात अडथळे आलेत तर मंगळवार उपवास करा. |
| २.१२ मीन राशी (Meena):<br><br> | ● *अ. शनि – १२, वा, गुरु - ३ रा , राहू -१  पहिला*<br>● *अ. स्वास्थ्य*<br>● अनपेक्षित रोगराई होईल. उष्णतेचे विकारां पासून सांभाळा.<br>● दीर्घ कालीन व्याधीचा जोर असेल. डोळे तपासून घ्या. |

| | |
|---|---|
| | • *ब . नोकरी/धंदा*<br>  ● महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीत भरपूर प्रगती होईल.<br>● *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ● घरात जास्त वाद घालू नका. तुमच्या नाका खाली काय शिजतेय त्याचा अंदाज घ्या.<br>● *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  ● रिस्क घेऊन पैसे कमवाल. साडेसाती चालू आहे हे विसरू नका.<br>● *इ . कौटुंबिक*<br>  ● आई वडिलांशी उत्तम जुळून येईल. गान, वादन करून त्यांच्या संगतीचा उपभोग घ्याल. भावंडांशी जमवुल घ्याल.<br>● *फ . परदेश गमन*<br>  ● तुमच्या महेनतीचे फळ मिळेल.<br>  ● परदेशी व्यापारा निमित नकीच जाल. |